# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 22-07-2025

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-07-22 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2025-07-23 | 2025-07-24 | 2025-07-25 | 2025-07-26 | 2025-07-27 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 15 | 32.9 | 18.8 | 34.5 | 83.4 |
| कमाल तापमान (अं.से) | 30.4 | 29.9 | 28.7 | 26.5 | 25.7 |
| किमान तापमान (अं.से) | 25.4 | 24.7 | 24.2 | 24.2 | 23.9 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 89.5 | 90.9 | 91.3 | 93.1 | 94.9 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 70.1 | 73 | 76.6 | 83.6 | 87.7 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 6.1 | 10.8 | 13.2 | 13.7 | 16.4 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 315 | 300 | 287.5 | 273 | 261.2 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 7 | 8 | 8 | 8 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २३ ते २७ जुलै २०२५ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक २३, २४, २५, २६ व २७ जुलै २०२५ रोजी सर्वत्र ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक २३ व २४ जुलै २०२५ रोजी मेघगर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता, • दिनांक २५ व २७ जुलै, २०२५ रोजी वादळी वाऱ्यासह (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना व विजांचा कडकडाट व मुसळधार स्वरूपाचा होण्याची शक्यता, • दिनांक २६ जुलै, २०२५ रोजी वादळी वाऱ्यासह (३० ते ४० किमी/तास), मेघगर्जना व विजांचा कडकडाट व मुसळधार ते अति मुसळधार स्वरूपाचा होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • पुढील २४ तासामध्ये विदर्भामध्ये कमाल फारसा बदल होणार नाही त्यानंतर पुढील ४ दिवसामध्ये कमाल तापमानात २ ते ४ अंश सेल्सिअस ने घट होईल. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक २७ जुलै ते ०२ ऑगस्ट २०२५ दरम्यान सरासरी पेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता, कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता तर किमान सरासरी एवढे र

### कृषि सल्ला:

• जिल्ह्यात सार्वत्रिक स्वरूपाच्या पावसाची, वादळी वाऱ्याची, मेघगर्जना, विजांचा कडकडाट व मुसळधार स्वरूपाच्या पावसाची शक्यता लक्षात घेता, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे पुढील ४ दिवस पुढे ढकलावी. • धान किंवा ईतर रोपांची पुनर्लागवडीच्या कामी शेतकरी व शेतमजुरांना जास्त संख्येने एकत्रित काम करणे टाळावे, शेतीतील अत्यावश्यक कामे करताना दोन शेतमजुरांमध्ये जास्तीत जास्त अंतर ठेवावे. अशा कामाच्या वेळी विजांच्या ठिकाणचे निरीक्षण

| |
|---|
| करण्यासाठी दामिनी लाईट निंग अलर्ट या मोबाईल app चा वापर करावा. वीज प्रवण क्षेत्रात असल्यास तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. • वादळी वाऱ्याची शक्यता लक्षात घेता फळबागा तसेच भाजीपाला पिकास बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • फळबागा, भाजीपाला पिके तसेच सोयाबीन, कापूस, तूर इत्यादी पिकामध्ये संभाव्य पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या. पिक क्षेत्रामध्ये साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कपाशीतील रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन: मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे. किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे. • नदी आणि नाल्यातून पाणी वाहत असल्यास शेतकरी, शेतमजुरांनी रस्ता ओलांडण्यासाठी घाई करू नये आणि त्यांचे इतर प्राणी वाहत्या पाण्यातून जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा. |

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| • कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे पुढील ४ दिवस पुढे ढकलावी. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या. पिक क्षेत्रामध्ये साचलेल्या पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कपाशीतील रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन: मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे. किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी @ १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी, आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे. • डवरणी आणि खुरपनीची कामे शक्यतो सकाळच्या वेळी करावी. प्रभावी तन व्यवस्थापनासाठी तन २ ते ३ पानावर असताना तन नाशकाचा वापर करावा. • पिक उगवणीनंतर तन व्यवस्थापनासाठी, रुंद पानाच्या तन नियंत्रणासाठी पायरिथिओबॅक सोडियम १० % ईसी १२.५ मिली ते १५ मिली प्रती १० लिटर पाणी किंवा गवतवर्गीय प्रकारच्या तन नियंत्रणासाठी क्विझालोफॉप इथाइल ५ % ईसी १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असताना फवारणी करावी. • पिक उगवणीनंतर रुंद व अरुंद पानाच्या तन व्यवस्थापनासाठी पायरिथिओबॅक सोडियम ६ % ईसी + क्विझालोफॉप इथाइल ४ % ईसी २० ते २५ मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. • बागायती संकरीत कपाशीला नत्राची पहिली मात्रा ४० किलो नत्र (९० किलो युरिया प्रती हेक्टर) तर कोरडवाहू संकरीत कपाशीला नत्राची मात्रा ४५ किलो (९७.६५ किलो युरिया पप्रती हेक्टर) या प्रमाणात द्यावी. • कपाशी मध्ये रस शोषक किडीचे निरीक्षण करावे आणि लेबल क्लेम आधारित शिफारशीनुसार कीटकनाशकाची फवारणी करावी. |
| सोयाबीन | • संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या. पिक क्षेत्रामध्ये साचलेल्या पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भात | • तण व्यवस्थापन:- तण व्यवस्थापनाकरिता तण नियंत्रणासाठी पेंडीमेथॅलीन ३०% ई. सी. (उगवणपूर्व) @ ५० मि.ली. किंवा प्रेटिलाक्लोर ५०% ई. सी. (उगवणपूर्व) @ २० ते ३० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर ओलावा असल्यास लगेच फवारणी व ३० दिवसांनी निंदण करावे. • उगवणपश्चात:- बिस्पायरीबॅक सोडियम २0% + पायरोझोसल्फुरॉन इथाइल १५% WGD ३५% @ ०२ gm १० लिटर पाण्यात पेरणीनंतर १० ते १२ दिवसांनी किंवा मेटसलफ्यूरॉन मिथील १०% + क्लोरिम्युरोन इथाइल १०% WP २०% @ ०.७ ग्रॅम पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी १० लिटर पाण्यात फवारणी करावी. • मित्र किडींच्या संवर्धनासाठी धान बांधावर झेंडू व चवळी पिकाची लागवड करावी. • रोपवाटीका:- खोडकिडा व गादमाशीच्या व्यवस्थापनाकरिता कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५ किलो ग्रॅम प्रति हेक्टर (कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार २५० ग्रॅम प्रति १०० वर्ग मीटर रोपवाटीका) रोपकाढणीच्या ५ दिवस अगोदर रोपवाटीकेत टाकावे. • धान रोपवाटीका तण विरहीत ठेवावी. • धान बांधावर झेंडूची सापळा पिक म्हणून लागवड करावी. • रोपांचे शेंडे तोडून बांबूच्या टोपलीत जमा करावी त्यामुळे रोपांच्या शेड्यांवर असणारी खोडकीडींची अंडी नष्ट होवून त्यामधून परोपजिवी किटकसूद्धा बाहेर पडतील. • गादमाशी प्रवण क्षेत्रामध्ये धानावरील गादमाशीचा प्रादुर्भाव कमी करण्याकरिता रोवणी २ ते २० जुलै दरम्यान करावी. • तुड्तुड्यांच्या व्यवस्थापनाकरिता रोपांची लावणी शिफारसीत अंतरावर (२० x १५ किंवा २० x २० सें.मी.), पट्टा पद्धतीने लागवड करावी (१० ओळी किंवा २ मीटर नंतर ३० सेमी. जागा मोकळी सोडावी). |
| तूर | • संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या. पिक क्षेत्रामध्ये साचलेल्या पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही यासाठी चर फोडावे. फळबागे मध्ये साचलेल्या पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • कोळी कीड नियंत्रणासाठी उपाययोजना: • जर २% फळे व १० % पाने कोळीमुळे प्रभावित दिसत असतील, तर ही "आर्थिक नुकसानीची पातळी" समजली जाते आणि या स्थितीत त्वरित नियंत्रणात्मक उपाययोजना राबवणे आवश्यक ठरते. • १. सेंद्रिय उपाय: अझेंडीरॅक्टीन (१%) २ मि.ली. किंवा नीम तेल १० मि.ली. प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून फळधारणेच्या वेळी फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते. १५ दिवसांच्या अंतराने पेट्रोलियम स्प्रे ऑईल (हॉर्टीकल्चर मिनरल ऑईल) (२%) २० मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणात घेऊन दोनदा फवारणी करावी, • २. रासायनिक उपाय: कोळीचा प्रादुर्भाव दिसताच स्पायरोटेट्रामेंट (१५.३१% ओडी) ०.६ मि.ली. किंवा डायफेनथीयुरॉन (५० डब्लुपी) २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळुन फळधारणेच्या वेळी १५ दिवसांच्या अंतराने फवारणी केल्यास ही कीड नियंत्रणात ठेवता येते. • पाने खाणारी अळी (लेमन बटरफ्लाय) या किडीचे व्यवस्थापन: रोपवाटीकेमध्ये व लहान बगीच्यात झाडांवरील अळीच्या विभिन्न अवस्था हाताने जमा करून नष्ट कराव्यात. बेसिलस थूरीनजीएनसीस (बीटी) २ ग्रॅम प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून अळीच्या सुरवातीच्या अवस्थेत १० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. • रासायनिक उपायः अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस (२५ ई.सी.) २.० मि.ली. प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून अळीच्या सुरवातीच्या अवस्थेत १० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. • जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्याची खात्री आणि वाफसा आल्यानंतर भरून ठेवलेल्या खड्ड्यांमध्ये संत्र वर्गीय फळझाडांच्या कलमांची लागवड करावी. कलमा लावतांना कलमांचा डोळा १५ ते २० सेंमी उंचीवर असावा. कलमा लावण्यापूर्वी मुळांना मेफेनोक्झाम एम झेड-६८ २.५ ग्राम आणि कार्बेन्डाझीम ५० % डब्ल्यूपी १ ग्राम प्रती १ लिटर पाणी या प्रमाण द्रावण तयार करून बुडवून नंतर लावावीत. • झाडांच्या बुंध्याजवळ पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. झाडावरील पानसोट काढून टाकावेत. दोन ओळीमधील मोकळ्या जागेत उडीद, मुग, सोयाबीन, भुईमुग इत्यादी पिकाची आंतरपीक म्हणून लागवड करावी. हिरवळीच्या खताच्या उपलब्धतेसाठी धेंचा किंवा ताग ४० किलो प्रती हेक्टर बियाणे या प्रमाणात पेरणी करावी. • नवीन नवतीवर सिट्रस सिला, मावा |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | आणि नाग अळीचा प्रादुर्भाव सामान्यपणे दिसून येतो. या किडींच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट# ३० ईसी @ २० मिली किंवा थायमेथोक्झाम# २५ डब्ल्यूजी @ ३.० ग्राम किंवा इमिडाक्लोप्रीड# १७.८ एसएल @ ५.० मिली तसेच कोळी किडीच्या व्यवस्थापनासाठी डायफेनथीयुरोन# ५० डब्ल्यूपी @ २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून नवतीच्या काळात स्वच्छ हवामान परिस्थिती असताना फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास वरीलपैकी कोणत्याही किटक नाशकाची १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. (संदर्भ: डॉ. पंदेकृव्ही, अकोला व सिसीआरआय, नागपूर) |
| मिरची | • संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहणार नाही यासाठी सऱ्या फोडाव्या. पिक क्षेत्रामध्ये साचलेल्या पावसाच्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. • मिरची च्या ४ ते ६ आठवड्याच्या वयाच्या रोपांची लागवड वाफसा अवस्थेत करावी. • मिरचीच्या रोपांची लागवड करण्यापूर्वी रोपांचे शेंडे डायमेथोएट ३० ईसी १० मि. ली + पाण्यात मिसळणारे गंधक (८० %) ३ ग्रॅम + मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यूपी २.५ ग्रॅम एक लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लावावे. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • पाऊस व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • जनावरे पावसात फार काळ भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |